## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.

# कै. आ. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा व शिका)

# शैक्षणिक अहवाल : 2018-19

शैक्षणिक वर्ष 2018-19 श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात कै. आ. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना (कमवा व शिका) प्रकल्पाअंतर्गत खालील उपक्रम राबवित आहोत.

**बाग कुपनवाल**: **(Garden compound wall)**

महाविद्यालयातील लुबीनी उद्यानात या वर्षी जवळपास 300 रोपे हे बाड (black aklipa) या जातीची रोपांपासून बागेत compound wall तयार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याच बरोबर काही प्रवेशद्वारापासून ते महाविद्यालय ईमारती पर्यंत शोभेची फुलांची जवळपास 140 रोपी लावली.

**गांडूळखत प्रकल्प** :

गांडूळखत आपल्याला कसे उपयोगी आहे ते पाहू -

जमिनीचा पोत सुधारतो, मातीच्या रचनेत योग्य असा बदल घडवला जातो, गांडूळांच्या बिळामूळे झाडांच्या मुळांना इजा न होता उत्तम मशागत केली जाते. जमिनीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढते, जमिनीची धूप कमी होते, जमिनीचा पीएच योग्य पातळीवर राखला जातो, गांडूळा खालची माती वर आणून तिला उत्तम प्रकारची बनवतात, गांडूळामध्ये हुमसचे प्रमाण भरपूर असल्याने नत्र स्फुरदपालाश व इतर सुक्ष्म द्रव्ये झाडांना भरपूर प्रमाणात व लगेचच उपलब्ध होतात. जमिनीतील उपयुक्त जिवाणूंची वाढ चांगली होते, मातीचा कस टिकून राहतो तेव्हा कंपोस्ट खत व गांडूळ खत याचा वापर करू या. त्यामुळे आपले आरोग्य छान राहील. काम करायला उत्साह येईल. गांडूळाच्या जीवनामध्ये अंडी, बाल्ल्यावस्था आणि पुर्णावस्था अशा तीन अवस्था असतात या सर्व अवस्थासाठी ओलसर जमीन आवश्यक असते. गांडुळाचा जीवनक्रम प्रामुख्याने त्याच्या जातीवर अवलंबून असतो. पुर्ण वाढ झालेल्या गांडुळ प्रत्येक सहा ते सात दिवसांनी अंडी घालतात. गांडूळामध्ये स्त्री आणि पुरूष असे दोन्हीही अवयव असतात. ते 7 अंडी अवस्था हवामानाचे अनुकूलतेनूसार असतात. या अंड्यामध्ये दोन ते वीस गर्भ असतात. 20 दिवसांची असते त्यानंतर तो जेव्हा पूर्णावस्थेत येतो तेव्हा तोंडाकडील गांडूळाची अपुर्णावस्था दोन ते तीन महिन्याची असते. हे वयात आलेल्या गांडूळाचे लक्षण होय. आकाराचा भाग जाड होतो. सर्वसाधारणपणे गांडुळाचे आयुष्य दोन ते तीन वर्षाचे असते. इसिनीया

फेटीडा या जातीच्या पूर्ण वाढ झालेल्या एक किलोमध्ये सर्वसाधारणपणे पूर्ण वाढ झालेली एक हजार गांडूळे असते. 15 ते 12 गांडूळांची लांबी अशी हजार गांडूळे घेवून त्यांची अनुकूल वातावरणात वाढ केल्यास एका वर्षात त्यांची संख्या आठ लक्ष त्र्याएंशी हजार होते. शंभर किलो प्रौढ गांडूळे एका किलोमध्ये दोन हजार बसतात. महिन्याला एक टन गांडूळखत तयार करतात. आपण गांडूळ ज्याला इंग्रजीमध्ये Earthworm म्हणतात. याचा जीवनक्रम पाहिला हा छोटासा प्राणी आपणा सर्वांचा मित्र आहे. त्याला शेतकऱ्यांचा मित्र असे म्हटले जाते. कारण तो पैसे न घेता शेताची मशागत करून जमीन सुपीक बनवतो. मनुष्याने या छोट्या प्राण्याकडून बोध घ्यायला पाहिजे. कारण हा प्राणी निस्वार्थीपणे तुमच्या उपयोगी पडतो.








**रोप वाटिका**:

महाविद्यालय परिसरात रोपवाटीकेची उभारणी केली आहे. या मध्ये या वर्षी तुलस, आवळा, चिंच, शेवगा, लिंब या रोपाची लागवड करण्यात आलेली आहे.

**ठिबक सिंचन प्रकल्प**:

गेल्या काही वर्षापासून या परिसरात पावसाचे प्रमाण फारच कमी झाले आहे. या अनुशंगाने आम्ही कमी पाण्यात जास्त उत्पादन कसे घेता येईल यो हेतूने आमच्या परिसरात नवीन लागवड केलेली रोपे यांना ठिबक सिंचनद्वारे पाणी देण्याची व्यवस्था केली आहे. पाणी बचतीचे महत्त्व व उत्पादनात होणारी वाढ याचे महत्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजवण्याचे काम या योजनेद्वारे प्रयत्न केला आहे.

**जलपुर्नभरण प्रकल्प**:

महाविद्यालय इमारत परिसरात पडणारे पावसाचे सर्व पाणी पाईपद्वारे ईमारतीच्या पायाला खाली 2X2 आकाराचे शोष खड्डे मध्ये सोडलेले आहे व हे पडणारं पाणी महाविद्यालय परिसरातच मुरते. महाविद्यालयाच्या परिसरातील विहरीच्या पाण्याची पातळी वाढण्यास मदत होते.

**परिसर स्वच्छता, देखभाल व निगा:**

महाविद्यालयाच्या 4 एकर परिसरातील सर्व झाडे, फुलझाडे, फळझाडे, वेली या वृक्षांची निगा व देखभाल या योजनेच्या माध्यमातून केली जाते.

**कोरफड लागवड प्रकल्प:**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात 2008 पासून कै. आ. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना कमवा व शिका योजना राबवित आहोत. आता पर्यंत आम्ही योजनेअंतर्गत खडु निर्माती पालेभाज्यामध्ये पालक, मेथी, मुळा, कोथिंबीर, लसुण तसेच पपई, शेवगा अशा विविध फाळांची लागवड आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने हे उपक्रम यशस्वीरित्या ही योजना राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत. श्रम प्रतिष्ठा, या योजनेचा मुळा उद्देश व श्रमाचे मुल्य विद्यार्थ्यांच्या अंगी रुजावे, श्रमाचे महत्त्व त्यांना पटावे हाच उद्देश समोर ठेवून आम्ही राबवितो.













**शैक्षणिक वर्ष 2018-19 : लागवड**

1) Alklipa बाड रोपे : 300 नग
2) शोभेची फुलझाडे : 150
3) कोरफड : नवीन रोपे लागवड : 100

महाविद्यालयातील परीसरचे Green Audit दर वर्षी केले जाते.

**कमवा व शिका योजनेचे वेळापत्रक:**

कमवा व शिका योजना महाविद्यालयात ऑगस्ट मध्ये प्रवेश झाल्यानंर योजनेविषयी नोटीस लावली जाते. सप्टेंबर मध्ये मुलाखतीद्वारे निवड करून ऑक्टोबर पासून ते फेब्रुवारी पर्यंत 5 महिन्याकरीता ही योजना राबवली जाते. 2018-19 मध्ये 2 मुले व 3 मुली अशी विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

**आर्थिक तरतूद:**

| | | |
|---|---|---|
| महाविद्यालयाचा हिस्सा | = | 5000 रू. |
| विद्यापीठाचा हिस्सका | = | 5000 रु. |
| एकूण | = | 10000 रू. |

**कामाचे वेळापत्रक:**

कामाचे दिवस 20 आणि दिवसातून 02 तास रोज काम केले जाते. दोन तासाचे मानधन = 20 रू. प्रति दिवस असे एकूण 20 दिवस X 20 रु. = 400 रू. प्रति महिना दिले जाते.

**कामाची वेळ:**

सार्वजनिक सुट्टी वगळता, दुपारी 3 ते 5

**योजनेचा कालावधी:**

ऑक्टोबर ते फेब्रुवारी = 5 महिने ही योजना राबविण्यात येते.

**सल्लागार समिती:**

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| 01 | डॉ. एस. आर. टकले | अध्यक्ष |
| 02 | डॉ. जी. डी. कुलकर्णी | प्रमुख |
| 03 | श्री. रमेश जगधने | सहाय्यक |

वर्ष 2018-19 मध्ये ही योजना राबविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. विद्यार्थ्यांना पुस्तकीज्ञाना बरोबरच पुढील आयुष्यात नोकरीच्या मागे न लागता स्वत:च्या पायावर आत्मनिर्भर होता यावे व आत्मविश्वास वाढावा हा या योजना चालू करण्यामागचा उद्देश आहे.

पुढील काळात सुद्धाही योजना अशीच चांगल्या पद्धतीने राबविण्याची हमी देतो.

धन्यावाद!

प्रमुख
डॉ. गणेश कुलकर्णी
कमवा शिका योजना

प्राचार्य
डॉ. एस. आर. टकले